# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मानव्यविज्ञान शाखा**

बहिस्थ शिक्षण विभाग

**एम. ए. मराठी द्वितीय वर्ष: सत्र – तिसरे**

अभ्यासपत्रिका कोड क्रमांक: ६०१

**एका लेखकाचा अभ्यास: राजन गवस**

---

## अभ्यासक्रम

**घटक क्र.१. एका लेखकाच्या अभ्यासाचे स्वरूप**

**घटक क्रमांक २. कादंबरी- भंडारभोग**

**घटक क्रमांक ३. कथा- ढव आणि लख्ख ऊन**

**घटक क्रमांक ४. ललित- कैफियत**

**घटक क्रमांक ५. समीक्षा- रोकडे पाझर**

## घटक क्र.१. एका लेखकाच्या अभ्यासाचे स्वरूप

एका लेखकाचा अभ्यास करत असताना अभ्यासकासमोर काही आव्हाने असतात. त्या लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास आणि आकलनाबरोबर लेखक म्हणून जडण-घडण झालेल्या व्यक्तिमत्त्वाचा, लौकिक जीवनाचा, लेखकाच्या स्वतंत्र जीवनदृष्टी - मूल्यदृष्टीचा, तत्कालीन देश - काल परिस्थितीचा (लेखकाची जडण-घडण आणि लेखनकाळ असे दोन्ही) अभ्यास करावा लागतो. याबरोबरच त्या लेखकाने हाताळलेल्या समग्र **वाङ्मय प्रकाराचे** आकलन होणे तर आवश्यक आहेच: पण त्या लेखकाच्या प्रकृतीधर्माशी अधिक जुळणारा **वाङ्मयप्रकार कोणता, ज्या वाङ्मय**प्रकारासाठी सिद्धहस्त लेखक म्हणून त्या लेखकाचे नाव विशेषत्वाने घेतले जाते त्यातील बारकावे, वेगळेपण आणि योगदान शोधणे गरजेचे असते. लेखकाची नाममुद्रा असलेला साहित्यप्रकार विशेष गांभीर्याने समजून घ्यावा लागेल.

लेखकाचा लेखन काळ, त्याच्या **वाङ्मय**यीन कलाकृतीची निर्मिती आणि त्याचा लेखनविकास यातील संगतीचा शोध अभ्यासकाला घेता आला पाहिजे. लेखकाच्या कर्तृत्वाचा आणि त्याच्या **वाङ्मय**यीन व्यक्तिमत्त्वाचा व्यवस्थित परिचय करून घेता आला पाहिजे. एकूणच त्या लेखकाचे **वाङ्मय**यीन योगदानाचे मूल्यमापन करता आले तर एका लेखकाचा अभ्यास हा अधिक सफल आणि परिपूर्ण होण्याकडे जाऊ शकतो. यासाठी पुढील घटक महत्त्वाचे ठरतात. -

**१. लेखकाची जडणघडण** - लेखकाच्या **वाङ्मयाचे** आकलन होण्यासाठी त्या लेखकाची जडणघडण कशी झाली आहे, लेखक म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा पिंड कसा उभा राहिला आहे, त्या लेखकावर इतर पूर्वसूरी अथवा समकालीन लेखकाचे, व्यक्तींचे काही संस्कार झाले आहेत काय याबरोबरच त्या लेखकाच्या साहित्य निर्मितीच्या प्रेरणा कोणत्या आहेत या बाबींचा उलगडा झाल्यास लेखकाच्या साहित्यिकृतीचे आकलन अधिक चांगले होण्यास मदत होऊ शकते.

**२. लेखकाचा लेखनकाळ** - लेखकाचा जो लेखनकाळ असतो त्या काळाचे काही महत्त्व असते, वेगळेपण असते. त्या काळात काही नैसर्गिक, मानवनिर्मित घटना - घडामोडी घडलेल्या असतात. समाजासमोर एखादे आदर्श निर्माण झालेला असतो अथवा एखादा मूल्य पायदळी तुडविलेले असते. एखादे घटना लेखकाच्या लेखन अवकाशाला व्यापून टाकणारी असते याचा अनुबंध समजून घेण्यासाठी लेखकाचा लेखनकाळ महत्त्वाचा असतो आणि तोही समजून घ्यावा लागतो. लेखकाची जडण-घडण आणि लेखनकाळ अशा दोन्ही दृष्टीने लेखनकाळ महत्त्वाचा असतो.

**३. लेखकाने हाताळलेले विविध वाङ्मयप्रकार** - लेखकाने कोणकोणते **वाङ्मय** प्रकार हाताळलेले आहेत, त्याच्या निर्मितीचा आलेख / क्रम कसा आहे, याचा विचार करावा लागेल. काही वेळा लेखकाने प्रारंभी हाताळलेला वाङ्मयप्रकार आणि त्या लेखकाची एखाद्या लेखनप्रकारात सिद्धहस्त लेखक

म्हणून असणारी ओळख यात बदल असू शकते किंवा प्रारंभीच्या वाङ्मयप्रकारात नवेपणाच्या काही पाऊलखुणा असू शकतात, अथवा लेखकाचं व्यक्त होणं प्रारंभीच्या कलाकृतीत पुरेपूर उतरलेला असू शकते आणि नंतरच्या कलाकृतीत लेखकाचा खरा कस पणाला लागलेले असतो. ते बारकाव्यानिशी शोधता आले पाहिजे.

**४. लेखकाच्या जीवननिष्ठा** - लेखकाची विचारसरणी, लेखकाच्या जीवननिष्ठा, लेखकाच्या आस्थेचे विषय, लेखक म्हणून वेळोवेळी घेतलेल्या भूमिका याचा अन्वय त्याच्या कलाकृतीशी लावून पाहता येतो. लेखकाचं जगणं, लिहिणं आणि बोलणं यात संगती असावी, हे अपेक्षितच आहे. यातून समग्र लेखकाचा मूल्यात्मक दृष्टिकोन अधिक तपासून पाहता येतो.

**५. लेखकाचा लेखनकाळ आणि समकालीन लेखक**- तत्काळात इतर मान्यवर लेखकांच्या लेखनाचे, आकृतीबंधाचे, आस्थेचे काही विषय असू शकतात. याबरोबरच वाङ्मययीन दृष्टिकोनातून काही नवे प्रयोग असू शकतात अशावेळी अभ्यासविषय असलेल्या लेखकांचा काय दृष्टिकोन असू शकतो, हे तपासून पाहता येतो. वाङ्मयीन प्रयोगाचा निकष हा महत्त्वाचा असतोच असे नाही तरीही मात्र दखलपात्र संदर्भ शोधून साधकबाधक चर्चा होणे आवश्यक असते.

**६. लेखकाचे विशिष्ट साहित्यप्रकारातील योगदान** - लेखकाने विविध वाङ्मय प्रकार जरी हाताळलेले असले तरीही लेखकाची नाममुद्रा ही एका विशिष्ट वाङ्मयप्रकाराशी नैसर्गिकपणे जुळलेली असते. म्हणून लेखकाचा उल्लेख त्या त्या वाङ्मय प्रकारातील योगदानाबदल केला जातो.

लेखकाने हाताळलेले विषय, निवेदनाची पद्धती, समग्र जीवनदर्शन, जीवनातील विविध घटितांचे व घटनांचे केलेले चित्रण अथवा मूल्यमापन या सर्वांचाही अभ्यास आवश्यक ठरतो. आकृतीबंध, शैली, शब्दकळा, म्हणी - वाक्प्रचारांचा आशयाशी असणारा एकसंघपणा समजून घ्यावा लागेल.

एका लेखकाचा अभ्यास करत असताना तो अभ्यास परिपूर्ण व्हावा, लेखक म्हणून समजून घेण्यासाठी तो पुरेसा व्हावा आणि तो अभ्यासविषय फलदायी व्हावा यासाठी विविध बाबी लक्षात घेतल्या जाव्यात, हे अपेक्षित आहे.

---

[(**टीप-** जिज्ञासू विद्यार्थ्यांनी- डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांचा 'एका लेखकाचा अभ्यास' ('प्रतिष्ठान', मराठवाडा साहित्य परिषदेचे मुखपत्र, मार्च - एप्रिल २००३) शीर्षकाचा उत्कृष्ट लेख एकदा मुळापासून अभ्यासावा. माहितीस्तव त्या लेखातील मुख्य घटक -

१) लेखकाचे जीवन आणि व्यक्तिमत्त्व
२) देश - काल – परिस्थिती
३) वाङ्मयीन वातावरण
४) लेखकाने हाताळलेले वाङ्मय प्रकार
५) लेखकाच्या प्रकृतीविशेषाशी अधिक जुळणारा वाङ्मयप्रकार कोणता?
६) लेखकाच्या वाङ्मयकृतींतून प्रकट होणाऱ्या आशयाचे स्वरूप

७) जीवनानुभवांचा अन्वयार्थ लावणारा लेखकाचा मूल्यात्म दृष्टिकोन
८) लेखकाने हाताळलेल्या वाङ्मयप्रकाराला दिलेले वेगळे स्वरूप
९) समकालीन व उत्तरकालीन लेखकांवर त्या लेखकाचा पडलेला प्रभाव
१०) वाङ्मयेतिहासातील त्या लेखकाचे स्थान
११) लेखक म्हणून भाषिक / वाङ्मयीन संस्कृतीवर झालेले परिणाम
१२) लेखक म्हणून स्थाननिश्चिती करणे ]

-----------------------------------------------

**१. एका लेखकाचा अभ्यास- लेखकलक्ष्यी:**

- ज्या अभ्यासपद्धतीत लेखक हा अभ्यासाचा केंद्रबिंदू मानला जातो.
- लेखकाची जीवनकथा, वैयक्तिक अनुभव, विचारप्रणाली, साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा, त्याची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि त्या लेखकाचे साहित्य त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडून समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

**लेखकलक्ष्यी अभ्यासाचे विशेष:**

१. लेखकाच्या जीवनचरित्रावर भर दिला जातो.

२. साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा, उगम व स्वरूप लेखकाच्या लौकिक जीवनाशी/ अनुभवांशी/ भूमिकेशी/ संघर्षाशी

जोडून पाहिला जातो.

३. लेखकाचा प्रकृतीधर्म, स्वभाव, संस्कार, वैचारिक भूमिका समजून घेतल्या जातात.

४. साहित्याचे मूल्यांकन करताना लेखकाला केंद्रस्थानी ठेवले जाते.

५. वाचकापेक्षा लेखकाला महत्त्व देण्याकडे कल असतो.

लेखकलक्ष्यी अभ्यास करायचा असेल तर त्याचे बालपण, जडणघडण, कौटुंबिक पार्श्वभूमी, गाव-प्रदेशांतील अनुभव, ग्रामीण जीवनाची-जगण्याची जाण, सामाजिक प्रश्नांविषयीची जाण आणि त्याविषयी त्यांची भूमिका, त्यांचे वैयक्तिक जीवन व विचारमूल्य आणि त्यातून अवतरलेली कथा, कादंबरी आणि इतर साहित्याचे स्वरूप यांचा परस्पर संबंध तपासता येईल. एकूणच काय तर त्यांच्या भूमी आणि भूमिकेपासून दूर जाऊन साहित्याचा अभ्यास करता येणार नाही.

लेखकलक्ष्यी अभ्यास म्हणजे, ‘लेखकाचे साहित्य समजून घेण्यासाठी त्या लेखकाच्या जीवनचरित्राला केंद्रस्थानी ठेवून केलेला अभ्यास होय.

एखाद्या लेखकाची साहित्यकृती, लेखनशैली, विचारसरणी आणि त्या लेखकाचे जीवन याचा अनुबंध तपासला जाणे अपेक्षित आहे. साहित्यिक योगदानाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. यात लेखकाच्या कार्याचा संदर्भ, त्या लेखकाच्या लेखनावर काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक प्रभाव तसेच त्याच्या लेखनातील मूल्यदृष्टी, शैली/ भाषा आणि लेखनाचे तंत्र यांचा विचार

केला जातो. उदाहरणार्थ, एखाद्या लेखकाच्या कथा, कविता, कादंबऱ्या किंवा नाटकांचा अभ्यास करताना त्याच्या वैयक्तिक जीवनानुभवांचा आणि तत्कालीन परिस्थितीचा त्याच्या साहित्यावर कसा परिणाम झाला, याचे विश्लेषण केले जाणेही अपेक्षित आहे.

हा अभ्यास साहित्य समीक्षात्मक, तुलनात्मक विश्लेषण किंवा चरित्रात्मक दृष्टिकोनातून केला जाऊ शकतो. उद्देश असा असतो की, लेखकाच्या साहित्यिक विश्वाला समजून घेणे आणि त्याच्या कार्याचे महत्त्व उलगडणे हा होय.

**२. एका लेखकाचा अभ्यास- आशयलक्ष्यी:**

साहित्यकृतीचा अभ्यास करताना लेखक वा वाचक यांना केंद्रस्थानी न ठेवता साहित्याचा आशय विषयवस्तू

म्हणून केंद्रस्थानी ठेवला जातो. ग्रंथात कोणते विचार, समस्या, मूल्ये, अनुभव, तत्त्वे, जीवनदृष्टी किंवा सामाजिक भान व्यक्त झाले आहे, हे तपासले जाते.

**आशयलक्ष्यी अभ्यास- विविध दृष्टिकोन:**

१. विचारप्रधान दृष्टिकोन- लेखकाच्या साहित्यामध्ये आलेल्या धार्मिक, तात्त्विक, सामाजिक, राजकीय वा नैतिक विचारांचे विश्लेषण.

२. मूल्यप्रधान दृष्टिकोन- साहित्यकृतीतून प्रकट झालेली मानवी मूल्ये – जसे की सत्य, अहिंसा, प्रेम, समता, न्याय, करुणा यांचे विश्लेषण.

३. सामाजिक दृष्टिकोन- ग्रंथातील आशय समाजव्यवस्थेशी निगडीत आहे का? सामाजिक प्रश्न, सुधारणा, स्त्री-पुरुष समानता, जात- पंथ, ग्रामीण-शहरी जीवनाचे चित्रण इत्यादींचे विश्लेषण. लेखकाच्या कृतीतील समाज, संस्कृती आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास. यात साहित्य समाजाचे प्रतिबिंब कसे आले आहे आणि सामाजिक मूल्यव्यवस्था कशी प्रतिबिंबित झाली आहे, याचा विचार आवश्यक आहे.

४. सांस्कृतिक दृष्टिकोन- साहित्यकृतीतून प्रकट होणारी संस्कृती, लोकजीवन, परंपरा, लोकमानस, श्रद्धा-अंधश्रद्धा, लोककला यांचा अभ्यास.

५. मानसशास्त्रीय दृष्टिकोन- पात्रांचे मानसिक संघर्ष, व्यक्तिमत्त्व विकास, भावनिक आवेग व विचार यांचा अभ्यास. (कलाकृतीतील पात्रांचा मानसिक संघर्ष, भावना आणि मनोवस्था यांचा अभ्यास, जसे की, सिग्मंड फ्राईड यांचे मनोविश्लेषण)

६. मार्क्सवादी दृष्टिकोन- आर्थिक पाया, वर्गसंघर्ष आणि साहित्याचे सामाजिक हत्यार म्हणून विश्लेषण. यात साहित्य समाजातील वर्गलढ्यात कसे योगदान देते, याचा विचार होतो.

७. स्त्रीवादी दृष्टिकोन- लिंगभाव आणि स्त्री-प्रधान पैलू केंद्रस्थानी ठेवून अभ्यास. ज्यात स्त्रियांचा अनुभव आणि सामाजिक भूमिकांचा विचार होतो.

८. आध्यात्मिक/ धार्मिक दृष्टिकोन- कृतीतील आध्यात्मिक चिंतन, धार्मिक श्रद्धा, भक्तीभाव, तत्त्वज्ञान यांचे विश्लेषण.

९. नैतिक दृष्टिकोन- साहित्याद्वारे दिलेला नैतिक संदेश किंवा जीवनमार्ग.

आशयलक्ष्यी अभ्यास करताना आपण लेखक वा वाचक यांच्यावर न भर देता ग्रंथातील आशयाचे विविध पैलू तपासतो. लेखकाची मूल्यदृष्टी, परिवर्तनवादी/ सुधारणावादी भूमिका, साहित्याचे सामाजिक संदर्भ आणि वैचारिक पैलू यांवर केंद्रित असतो. यात साहित्यकृतीच्या रूपबंधापेक्षा (फॉर्म) पेक्षा आशय (कंटेंट) अधिक महत्त्वाचा असतो.

यासारखे दृष्टिकोन वापरून लेखकाच्या कार्यातील आशयाची खोली समजून घेता येते.

वरील पद्धतीशिवाय एका लेखकाच्या इतरही काही अभ्यासपद्धती आहेत. –

**एका लेखकाच्या विविध अभ्यासपद्धती- तुलना:**

| अ. क्र. | अभ्यासपद्धती | केंद्रबिंदू | वैशिष्ट्ये | उद्देश | उदाहरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | लेखकलक्ष्यी | लेखकाचे जीवन, अनुभव, विचार, व्यक्तिमत्त्व | लेखकाच्या जीवनपरिस्थितीशी साहित्याचा संबंध शोधणे | लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातून साहित्य समजणे | तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास तुकारामांच्या जीवनप्रसंगाशी जोडून करणे |
| २ | ग्रंथलक्ष्यी | साहित्यकृती | रचनाशैली, भाषा, अलंकार, रचना, अंतःसौंदर्य | ग्रंथाचे साहित्यिक मूल्य अधोरेखित करणे | ‘ज्ञानेश्वरी’चा अभ्यास फक्त तिच्या काव्यात्मक रचनेच्या आधारावर करणे |
| ३ | वाचकलक्ष्यी | वाचक आणि त्याचा प्रतिसाद | वाचकाची ग्रहणक्षमता, अर्थनिर्मिती, प्रतिसाद | वाचकाच्या अनुभवातून साहित्याचे नवे अर्थ उलगडणे | एखादी कादंबरी वाचकाच्या मनात जागवणाऱ्या प्रतिमा व अनुभूतींचा अभ्यास |
| ४ | समाजलक्ष्यी | समाज आणि साहित्य यांचा संबंध | सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी | साहित्य समाजाचे प्रतिबिंब कसे आहे, हे दाखवणे | सामाजिक सुधारणांच्या चळवळीतील संतसाहित्याचा अभ्यास |

---------------------------------------------

**राजन गवस यांचे लौकिक जीवन:**

राजन गवस यांचे पूर्ण नाव राजन गणपती गवस असे असून त्यांचा जन्म दि. १ जून १९५९ रोजी अत्याळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे झाला. त्यांचे मूळ गाव करंबळी; पण त्यांचे बालपण करंबळीपेक्षा आजोळ असलेल्या 'अत्याळ' या गावी गेले. प्राथमिक शिक्षण अत्याळ येथेच झाले. शेतीवाडी, घर मात्र करंबळी येथे. आजोबा, वडील हे सर्व शेतीच करणारे म्हणजे मध्यमवर्गीय गरीब शेतकरी कुटुंबातील. घरात कृषिसंस्कृतीचा वारसा. राजन गवस हे अक्षर - साक्षर असणारे घरातील पहिलेच. "मुळामध्ये लेखन ही आमच्या घरची परंपरा नाही. मी शेती संस्कृतीत वाढलेला, आमच्या घरातला शिकणारा मी पहिला माणूस असं काहीतरी ते होतं."[१] शेती संस्कृतीची जवळीकता असल्यामुळे शेती-मातीच्या अंगाखांद्यावर खेळून राजन गवस लहानाचे मोठे झाले. त्यांच्यात कृषिजन परंपरेचे संस्कार रुजले. बालपणी चार भिंतीच्या शाळेत मन कधी रमलेच नाही. घरात शिक्षित असे कुणीही नव्हते आणि शैक्षणिक वातावरणही नव्हते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाकडे बालपणी फारसे कुणी लक्ष दिले नाही. शिवाय चार भिंतीच्या शाळेपेक्षा त्यांचे मन शाळा चुकवून रानात भटकणे; कोल्ह्याची, मुंगसाची पिल्ले पाळणे यांतच रमत असे. शाळेपेक्षा बालमित्र व निसर्गाचा सहवास अधिक चांगला वाटायचा. "दुसरीला असताना खारुट्याची पिलं घेऊन मी शाळेत गेलो, तर गुरुजींनी रानटी म्हणून खूप बदडलं. म्हणून मग दुसऱ्या दिवशी पळसाच्या पानावर सापाची पिल्लं पुडी बांधून गुरुजीच्या टेबलावर नेऊन ठेवली. याचा परिणाम म्हणजे माझी शाळा सुटली, चार महिने घरात."[२] असा बालसुलभ खट्याळपणा अंगात मुरलेला होता. या अनुभवानंतर आईने याच काळात शिक्षणासाठी 'अत्याळ' या आजोळच्या गावी रवानगी केली. अत्याळ हे करंबळीपासून जवळच, दोन कोसांवर होते. 'अत्याळ'ला पाठविण्याची दोन कारणे. एकतर आजोबा आणि वडील यांच्यातील सततच्या भांडणामुळे अंगच्या कपड्यानिशी कुटुंबाला घराबाहेर पडावे लागले. आई-वडिलांचा स्वभाव स्वाभिमानी असल्याने परत माघारी ते फिरले नाहीत. वडिलांनी पंचमंडळीची जमवाजमव करून अजोबाकडून जमीन मिळावी म्हणून प्रयत्न केले; पण म्हातारा महाआबंड. म्हणाला, "जीवमान आसंपतोर शेताच्या वाटण्या करू देणार नाही."[३] वडिलांना नव्याने संसार उभा करावा लागला. या संसारात आईने खंबीरपणाने साथ दिली. दुसऱ्याच्या बांधावर काम करून मिळेल त्या मजुरीत घर-प्रपंच चालवला. यावेळी गावातील, नात्यातील कुणीही मदतीचा हात दिला नाही. मामाची काय तेवढी मदत असायची; पण मामाची मदत घ्यायला लेखकाच्या आईला संकोच वाटायचा. अशा या संघर्षाच्या परिस्थितीत शिक्षणाकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ नव्हता.

दुसरे कारण असे की, शिपूर नावाच्या गावचा एक जोगता कोंबड्यांचा व्यापार करायचा. बाजाराला जाता-येता वाटेतल्या गावी म्हणजे करंबळीला मुक्कामाला असायचा. या बालपणीच्या आठवणीसंदर्भात एका मुलाखतीत राजन गवस म्हणतात, "त्याच्याबरोबर गावभर भटकणं, हा माझा बऱ्यापैकी उद्योग होता. त्या काळामध्ये, म्हणजे लहानपणी मी जे प्रचंड उपद्व्याप केले, त्यांमधला हा एक महत्त्वाचा उपद्व्याप. त्याचा-माझा संवाद इतका छान चालायचा, की तो मला घेतल्याशिवाय कोठेही जायचाच नाही. म्हणजे मी जी 'भंडारभोग'ची अर्पणपत्रिका केली आहे... त्यावेळी या सगळयाभोवती फिरत असताना मला त्यातलं काहीच जाणवत नव्हतं. त्याच्या पाठीमागं फिरतो म्हणून मला घरातून हाकललं आणि आजोळी ठेवलं. का? तर हा शिकत नाही. हा नको त्या ठिकाणी फिरतो. यानं त्या ठिकाणी फिरू नये. आजोळ माझं जवळचं."[४] आणि मग शिक्षणासाठी अत्याळला रवानगी झाली.

अत्याळला शिक्षणासाठी जाणे राजन गवस यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. येथून पुढील शिक्षण मामाच्या गावी झाले. मामाची आर्थिक परिस्थिती चांगली होती. कुटुंबात सर्वांत लहान असल्यामुळे लाड होत असत. एका अर्थाने गावचा 'भाचा' असल्यामुळे सर्वजण लाड करायचे. प्रेमाने बोलायचे; पण शाळा आणि अभ्यासावर मात्र मामाचे कडक लक्ष होते. या वातावरणात शिक्षण चांगले होऊ लागले. अभ्यास नीट होऊ लागला. आई-वडिलांची हालाखीची परिस्थिती पाहून हतबल न होता जिद्दीने अभ्यास करण्यास प्रेरणा मिळाली. आपल्या आई-वडिलांना दारिद्र्यातून बाहेर काढून, त्यांना सन्मानाने जगवायचे, ही जिद्द निर्माण होऊ लागली. दिवसेंदिवस अभ्यासात चांगली प्रगती होत होती. शिक्षकांचेही चांगले लक्ष होते. अभ्यासाच्या निमित्ताने, शालेय स्पर्धा परीक्षेच्या निमित्ताने शाळेत, शिक्षकांकडे थांबण्याची परवानगी मिळाली. अभ्यासाच्या निमित्ताने रात्रीला घराबाहेर असल्यामुळे याचा परिणाम असाही झाला, की रात्रीला गावात सादर होणारी सोंगे, भजने, भारुडे तमाशा यांसारखे देशी सादरीकरणाचे कार्यक्रम पाहता येऊ लागले. यासाठी काहीवेळा बाहेरगावी पायपीट होऊ लागली; पण शालेय अभ्यासाबरोबरच देशी स्वरूपाच्या लोककलेचा आनंद घेता येऊ लागला. समृद्ध अशी परंपरा असलेल्या लोककलेचा जवळून परिचय होऊ लागला. लोककलेच्या सादरीकरणातील नाट्य लक्ष वेधून घेत होते. देशी जाणिवेचे संस्कार या संस्कारक्षम वयात त्यांच्यावर होत होते.

माध्यमिक शिक्षण चालू असताना आणि शिक्षणात चांगली प्रगती असूनही शाळेपेक्षा लोककला पाहण्यातच जास्त आवड निर्माण होत होती. ते लिहितात, "त्या काळात पुस्तके वाचण्यापेक्षा बाकीचे नादच अधिक केले. म्हणजे असेल त्या गावाला तमाशा बघायला जाणं. संग्या-बाळया, पारज्याट असे कन्नड खेळ व्हायचे. तिथेही आमची हजेरी ठरलेली. गावात आणि पंचक्रोशीत कुठेही सोगीभजन, कीर्तन असलं, की रात्र त्यातच. शाहीर तर अत्याळात तीन-चार. त्यांच्या शाहिरकीला रात्र पुरी पडायची नाही. त्यामुळे शाळेत लक्ष कमी; पण शिक्षक बरंच काय काय करून घ्यायचे. मला वक्तृत्व स्पर्धेलाही पाठवायचे; पण आमचं लक्ष शाळेपेक्षा बाकीच्या उद्योगातच अधिक."[५] एका बाजूला शैक्षणिक प्रगती चांगली होत होती, त्याबरोबरच वक्तृत्वासारख्या स्पर्धेतही सहभाग राहत होता; पण या शैक्षणिक, स्पर्धात्मक प्रगतीबरोबरच कविता लिहिण्याचा पहिला योगही याच काळात आला. हायस्कूलमध्ये शिकवणारे शिक्षक मदन हजेरी हे मराठी विषय शिकवायला होते. ते स्वतः कविता लिहीत, वक्तृत्व स्पर्धेत बक्षिसे मिळवीत. त्यांच्या सांगण्यावरून एक कविता लिहिली. नुकताच बेंदर (पोळा) सण काही दिवसांवर होता, हा सण डोळ्यांसमोर ठेवून बैलावर कविता लिहिली आणि ही कविता गडहिंग्लज येथून प्रकाशित होणाऱ्या दादा सबनीसांच्या 'मंथन' या भित्तिपत्रकासाठी पाठवून दिली. त्यात ती छापून आली. याचा राजन गवस यांना आनंद झाला. आपण लिहू शकतो, याचा एक आत्मविश्वास त्यांना आला. आपली प्रसिद्ध झालेली कविता पाहण्यासाठी आठ मैल पायपीट करीत राजन गवस यांना गडहिंग्लजला जावे लागले; पण कविता प्रसिद्ध झाल्याचा आनंद खूप मोठा होता. याच काळात हळूहळू वाचनाचा आवाका वाढत गेला. जणू छंदच जडत गेला. गावात किंवा शाळेत वाचनालय नव्हते; पण गडहिंग्लजाहून ये-जा करणारे शिक्षक विविध पुस्तके आणून देत. त्यात सानेगुरुजी, चिं. वि. जोशी यांचीही पुस्तके या विद्यार्थी जीवनात वाचण्यात आली. त्याचा पुढे खूप लाभ झाला.

वाचन, लेखन आणि देशी जाणिवेच्या लोककला आणि त्यांचे सादरीकरणाचे विलक्षण अनुभव घेत असताना राजन गवस यांचे एक व्यक्ती म्हणून असणारे व्यक्तिमत्त्व तर फुलत होतेच; पण या अनुभवसंपन्नतेमुळे वाङ्मयीन जडणघडण होण्यास हा काळ कारणीभूत ठरत होता.

लेखक म्हणून होत असलेल्या जडणघडणीला, सर्जकतेला आणखी एक बाब कारणीभूत होती आणि ती म्हणजे अत्याळ या गावातील प्रत्येक घरातला किमान एक तरी माणूस कामासाठी मुंबईला होता. या मुंबईवाल्या माणसांना कुटुंबाची ख्याली-खुशाली पत्र लिहून कळवावी लागायची आणि ते सर्व पत्रे लिहिण्याची, वाचण्याची जबाबदारी गावचा 'भाचा' म्हणून पोरसवदा राजन गवस यांच्यावर आली. सगळया गावची पत्र लिहावी लागायची. ही माणसं अशिक्षित असल्यामुळे पहिल्यांदा काय काय लिहायचं ऐकून घ्यावं लागायचं आणि मग लिहावं लागायचं याविषयी ते सांगतात, त्यामुळे लेखनाचे धडे मिळाले आणि पुढे कथालेखनाला प्रेरणा मिळाली. पत्र लिहावयास लावणारी व्यक्ती ही कधी सून; तर कधी सासू असायची. एकच गोष्ट वेगवेगळया पद्धतीने त्या दोघी सांगायच्या. त्यामुळे या एकाच घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होत गेला. याविषयी पुढे ते सांगतात, "सारांश लेखनाचे पहिले धडे मला माझ्या घरातल्या माम्यांनी दिले."[६] शिवाय ज्यांची पत्रे लिहावी लागायची त्या सर्व सासुरवासी सुना. या सुनांचाच सासुरवास विविध तऱ्हांचा असायचा शिवाय पतिसुखापासून वंचित असणाऱ्या या स्त्रिया म्हणजे धगधगते दुःख होय. त्या आपलं दुःख व्यक्त करीत असत. त्याविषयी ते सांगतातः "वेदनेची कोठारं म्हणजे या बायका. त्यांनी मला अकाली प्रौढ केलं!"[७] या सासुरवासी सुना, त्यांच्या व्यथा- वेदना, सासूछळाच्या त्यांच्या व्यथा ऐकून आणि सासूकडून सुनेबद्दलच्या तक्रारी ऐकून या हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या पोरसवदा वयातच लेखकाच्या अंगी एक प्रगल्भपणा येत गेला. एकाच घटनेकडे वेगवेगळया दृष्टिकोनांतून पाहण्याची दृष्टी विकसित होत होती. तशी अनुभूती यातून अनुभवता आली. व्यावहारिक जीवनाची अनुभूती प्रगल्भ होत होती. घराघरातील नातेसंबंध, मानवी दुःखाच्या विविध तऱ्हा याच काळात विविध पद्धतींनी अनुभवता आल्या. पुढे लिहिण्यासाठीचे असणारे अनुभवाचे क्षेत्र व्यापक होत गेले.

पुढे महाविद्यालयीन काळात लेखक म्हणून येणारे अनुभवक्षेत्र अधिक विस्तारले, ते अधिक व्यापक झाले. त्याची व्याप्ती मोठी झाली. त्यांचे पदवीस्तरावरचे शिक्षण गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालयातून सुरू झाले, त्यावेळी गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय हे तीन तालुक्यांत एकमेव होते. या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक हे कोणत्या ना कोणत्या चळवळीशी जोडले गेले होते. याच वेळी राष्ट्रसेवादलाच्या एका शिबिरात प्रा. विठ्ठल बन्ने आणि श्रीपतराव शिदे यांचा जवळून परिचय झाला. प्रा. विठ्ठल बन्ने हे तर शिवराज महाविद्यालयात शिकवायलाच होते, ते वर्गात आले, की विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणायचे, "अरे, कसली पुस्तकं वाचता गधड्यांनो! माणसं वाचा."[८] प्रा. विठ्ठल बन्ने पुरोगामी विचाराचे चळवळे प्राध्यापक होते. देवदासी मुक्ती संघटनेच्या माध्यमातून एक फार मोठी चळवळ त्यांनी उभी केली होती. गोव्यातील मंगेशी येथे इ.स. १९६८ मध्ये घेतलेल्या पहिल्या सभेसह महाराष्ट्रात शेकडो सभा घेऊन प्रा. विठ्ठल बन्ने यांनी त्या काळात देवदासी प्रथेच्या विरोधात रणशिंग फुंकले होते. त्यामुळे या प्रश्नावर महाराष्ट्रभर चर्चा सुरू झाली. १९७५ नंतर या चळवळीत राजन गवस यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. याच काळात जटमुक्ती चळवळीतही ते सक्रिय होते. या संदर्भात राजन गवस लिहितात, "कळत-नकळत त्या चळवळीचा सहप्रवासी बनलो. एक नवं जग समोर आलं. त्यातून परिषदा, मोर्चे सुरू झाले. कॉलेजपेक्षा ह्यातच मन अधिक गुंतत गेलं."[९] पुढे लिहिल्या गेलेल्या 'चौंडकं', 'भंडारभोग' या कादंबऱ्यांचे व काही

कथांचे आशयसूत्र हे देवदासी प्रथेशी संबंधित आहे. या देवदासी मुक्ती व जटमुक्ती या चळवळीच्या निमित्ताने आलेले दाहक अनुभव गाठीशी होते. या चळवळींनी अनुभवसमृद्ध केले. साहित्यनिर्मितीला भौगोलिक क्षेत्राचे, त्या क्षेत्राच्या अनुभवविश्वाचे अधिष्ठान प्राप्त झाले. या अनुभवविश्वाने कसे समृद्ध केले याविषयी ते लिहितात, "बन्ने सरांच्या नव्यानव्या संघटना. कधी माकडवाले, तर कधी भंगारवाले, कधी गोसावी, कधी बेरड तर कधी भंगी... त्यांना उत्साह प्रचंड. बन्ने सर आणि श्रीपती शिंदे यांना मोर्चे काढण्याचा नादच होता; पण त्या साऱ्यांनी मला भरघोस दिलं, जगण्याचं भान दिलं."[१०]

राजन गवस शिकत असताना बलवंत देशमुख त्या शिवराज महाविद्यालयाचे प्राचार्य होते. ते चांगले समीक्षक होते. लिहिणाऱ्या मुलांना प्रोत्साहन द्यायचे. अशा मुलांना पुस्तकांची पूर्णवेळ सुविधा उपलब्ध करून द्यायचे. लिहिणाऱ्या मुलांसाठी वाङ्मयीन वातावरण टिकून राहण्यासाठी महिन्यात एखाद-दुसरा कार्यक्रम घ्यायचे. वेगवेगळ्या स्पर्धेला, कविसंमेलनाला पाठवायचे. त्यामुळे कथा-कविता लिहिण्यास प्रोत्साहन मिळाले. स्पर्धा जिंकून आल्यावर वर्गा-वर्गातून फिरवून कौतुक करायचे. त्यामुळे लिहायला अधिक प्रेरणा मिळायची. 'शिवराज' नावाचा एक चांगला वार्षिक अंक महाविद्यालयातून निघायचा. त्यामुळे लिहायला संधी असायची. याच काळात मधुमालती कोटिभास्कर या मराठी शिकविणाऱ्या शिक्षिका उत्तम शिकविण्याबरोबरच नवलेखकांनी चांगले लिहावे म्हणून मार्गदर्शन करायच्या. लिहिलेले आत्मीयतेने वाचून सूचना करायच्या. त्यावर भरभरून बोलायच्या. चांगली पुस्तके विकत आणून वाचायला द्यायच्या. वर्तमानपत्रापेक्षा मासिकाकडे कथा पाठवून देण्यासाठी आग्रही असायच्या. तत्पूर्वी 'केसरी'ची रविवार पुरवणी पाहणारे प्रसन्नकुमार अकलूजकर यांनी याच काळात काही कथा छापलेल्या होत्या. सत्यकथेनं 'उचकी' नावाची कथा छापल्याचा आनंद सांगताना राजन गवस म्हणतात, "सत्यकथेचा अंक आमच्या घरात आला. कथा छापलेली. अंक घेऊन बाईचं घर गाठलं. तर त्यांनी दडपे पोहे खाऊ घातले. म्हणाल्या 'लिहिणं ही जबाबदारीची गोष्ट असते. तू ती जबाबदारीनं केली पाहिजे... तू लिही...' त्यानंतर काहीच न बोलता त्यांच्या घरातून निघालो. मला उगाचच लेखक झाल्यासारखं वाटू लागलं."[११]

गडहिंग्लज येथून बी. ए. पूर्ण झाल्यावर राजन गवस यांना एम. ए. मराठीच्या शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे प्रवेश घ्यावा लागला. येथे खऱ्या अर्थाने वाङ्मयीन दृष्टी प्राप्त झाली. तत्पूर्वी वाचन, लेखन सुरूच होते. याच काळात वाङ्मयीन जाणिवा समृद्ध करणाऱ्या विविध कार्यक्रमांत सहभाग नोंदवता आला. त्यावेळी मराठी साहित्यावर एका नेटक्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे मराठीतील दर्जेदार साहित्य व साहित्यिकांना जवळून पाहता, ऐकता आले. यामुळे वाङ्मयाकडे पाहण्याची दृष्टी लाभली. हा अनुभव सांगताना ते लिहितात, "एम.ए. च्या काळात शिवाजी विद्यापीठात मराठी साहित्यावर पॉप्युलर प्रकाशनाच्या सहकार्याने भलंमोठं चर्चासत्र भरलेलं. त्या वेळी साहित्य-समीक्षा यातलं फार काही कळत होतं, असं नाही, पण ऐकण्याचा उत्साह प्रचंड. त्या चर्चासत्रात एकाच वेळी शंभरएक लेखक एकदम बघितले. रा. नेमाडे, रा. दिलीप चित्रे, गंगाधर गाडगीळ, विद्याधर पुंडलिक असे सगळे. घणाघाती चर्चा. पाठीमागं बसून आमचं हा-हू चाललेलं; पण त्या चर्चासत्रातील निबंधांनी वाङ्मयाकडे बघण्याची माझी दृष्टीच बदलून गेली. आपण वाचतो ते किती सुमार! याशिवाय अस्सल बरंच आहे. आपण ज्याच्या प्रेमात पडतो, ते तर इथं चर्चेतही आलं नाही; असलं काय काय मनात सुरू झालं. त्या चर्चासत्रात ज्या लेखनाचा उल्लेख झाला, ते मिळवून वाचणं सुरू झालं. यातून नवीन दृष्टी विकसित होत गेली."[१२] डॉ. गो. मा. पवार यांच्या पुढाकाराने, पॉप्युलर प्रकाशन संस्थेच्या सहकार्याने मोठ्या चर्चासत्राचे आयोजन

करण्यात आले होते. याविषयी राजन गवस लिहितात, "भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, गंगाधर गाडगीळ, विद्याधर पुंडलिक या आणि अशा मान्यवर दादा साहित्यिक-समीक्षकांना जवळून पाहता आले. अनुभवता आले. ऐकता आले. त्यामुळे वाङ्मयाकडे पाहण्याची गंभीर दृष्टी प्राप्त झाली. पुन्हा नव्याने वाचनाला सुरुवात झाली. भालचंद्र नेमाडे, जी. ए. कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर यांच्या पुस्तकांनी झपाटून टाकले. वाचनाचा आवाका वाढला. चिंतन वाढलं, चिंतनाची दिशा बदलली. अनुभवाला थेटपणे भिडण्याची शक्ती मिळत गेली. माझा मीच बदललोय, हे मला थेटपणे जाणवायला लागलं."[१३] पुढे अभ्यासही चांगला होत गेला आणि पुढे ते विद्यापीठातून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

शिवाजी विद्यापीठातील एम. ए. च्या शिक्षणानंतर घरच्या सर्वसाधारण परिस्थितीमुळे एका तालुक्याच्या ठिकाणी नोकरी करण्याचा प्रसंग आला; पण तेथे शैक्षणिक वातावरण नव्हते. या विषयी ते म्हणतात. "एम. ए. नंतर एका कॉलेजात नोकरी मिळाली. आपण कॉलेजात मास्तर झालो, याचा आनंद होता; पण त्या आनंदावर पाणी पडलं. खेड्यापाड्यांतल्या कॉलेजात नोकरी म्हणजे भयावह अनुभव. संस्था फारच नावाजलेली; पण राजकारणानं पार सडलेली. तिथं हजर झालो तेव्हा प्रमुखांच्या चमच्यांनी कोणाशी बोलायचं, कोणाशी बोलायचं नाही, याची यादी दिली. पुन्हा माझ्यावर नजर ठेवण्यासाठी दोन वेगळे चमचे नेमले. ते प्रमुखाला मी उठतो केव्हा, झोपतो केव्हा, याचे तपशील पुरवायचे. वाटेत कोणी थांबवलं, कोणाशी बोललो याची नोंद प्रमुखाकडं अद्ययावत. सगळीकडं आणीबाणी. पंधरा ऑगस्टला कॉलेज सुरू. दिवाळीला बंद. महिन्यानं पुन्हा सुरू. २६ जानेवारीचं झेंडावंदन केलं, की सर्व कामकाज संपलं, त्यातही वर्षभर तास न घेणारे आठ-दहा जण. त्यांनी करायचं काय? तर साहेबांची सेवा. राजकारण. स्टाफरूममध्ये चर्चा काय? तर पगारात नवीन काय काय वाढलं! चुकून कधी पुस्तकाचा विषय निघाला तर सगळे खो-खो हसायचे. आपण उगाच आलो ह्या कॉलेजात, ही सतावणारी भावना. अज्ञात भीतीनं गारठलेलं वातावरण; तरीही लोक म्हणायचे, इथं लोकशाही आहे. एकदा प्रमुखांनी केबिनमध्ये बोलावलं. म्हणाले, वर्गात मुलांना परीक्षेपुरतं लिहून द्यायचं. जास्त शहाणपणा करायचा नाही. माझं काय चुकलं, मलाच कळत नव्हतं. केबिनच्या बाहेर आलो तर धिप्पाड चमचे जोरजोरात हसत उभे. या वातावरणात असाच राहिलो तर आपल्याला वेड लागेल, असं वाटायला लागलं."[१४] "आजूबाजूला लाचार माणसं, राजकारणी माणसं, त्यामुळे येथे फारसे मन रमले नाही; पण कौटुंबिक जबाबदाऱ्या असल्यामुळे नोकरी सोडता येत नव्हती. त्यामुळे 'सहन होत नव्हतं आणि सांगता येत नव्हतं' अशी गत होऊन राहिली होती. अशा या परिस्थितीत लेखकाच्या जगण्याचाच संकोच होत होता. लिहिण्याचाही संकोच होत होता. संघर्षाचा काळ अजून संपलेला नव्हता. अशात काही काळ पत्रकारितेत गेला. यावेळी विविध क्षेत्रांतील, विविध वृत्ती-प्रवृत्तींची माणसे अनुभवता आली. विशेषतः राजकीय क्षेत्रातील स्वार्थी लोक अनुभवता आले. या अनुभवाविषयी ते लिहितात, "माणूस म्हणून संपन्न होण्यास ही पत्रकारिता मदत करते. वेगवेगळया प्रकारचे अनुभव, नवनवे प्रश्न ह्या साऱ्यांशी तुम्ही थेट संबंधित होता. विविध प्रकारची माणसं, सरकारी कार्यालयांतील नोकर, पोलिस, अगतिक सामान्य माणूस, राजकीय क्षेत्रातील बडी धेंडं असं जिवघेणं काही अंगावर येतं. तो एक वेगळाच अनुभव होता. समृद्ध करणारा."[१५] १९८२ मध्ये विद्यापीठातून एम.ए. पूर्ण करून बाहेर पडल्यावर या नोकरीच्या संघर्षाच्या काळात दि. ३१ मार्च १९८३ मध्ये 'हुंदका' हा एकमेव काव्यसंग्रह महाराष्ट्र राज्य साहित्य, संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदानातून पारिजात प्रकाशनाने प्रकाशित केला. तत्पूर्वी हायस्कूलमध्ये शिकत असतानाच राजन गवस यांची 'बेंदूर' नावाची कविता दादा सबनीस चालवत

असलेल्या 'मंथन' नावाच्या भित्तिपत्रकात, तर महाविद्यालयीन काळात दै. ‘पुढारी’मध्ये पहिली कथा १९७८ मध्ये प्रसिद्ध झाली होती. १९८२ मध्ये त्या काळात अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या व वाङ्मयीन पिढी घडवणाऱ्या 'सत्यकथेत' 'उचकी' नावाची कथा छापून आलेली होती. यानंतर ते कादंबरीलेखनाकडे वळले. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील असणारे सामाजिक प्रश्न, जोग-जोगतीनींचे धर्मसंस्था व अज्ञानामुळे निर्माण झालेले प्रश्न हे त्यांच्या 'चौंडकं' (१९८५) व 'भंडारभोग' (१९८९) या दोन कादंबरी लेखनाच्या केंद्रस्थानी आहेत. ते त्यांच्या या दोन कादंबरीच्या आशयद्रव्यातून आले आहे. हे आशयद्रव्य कथेतून व्यक्त करावयास कदाचित मर्यादा पडत असावी, म्हणून मोठा प्रदीर्घ भाषिक अवकाश मांडता येणारा वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरी या वाङ्मयप्रकाराची निवड केली असावी. शिवाय व्यापक आणि भव्य जीवनदर्शन कादंबरीत मांडता येते आणि कादंबरी हा मूळ भारतीय भूमीशी निगडित असलेला महाकाव्यसदृश असा व्यापक जीवनजाणिवा व्यक्त करणारा वाङ्मयप्रकार आहे. या दोन्ही कादंबऱ्यांना सामाजिक व संस्थात्मक चळवळीची पार्श्वभूमी आहे. चळवळीच्या माध्यमातून गडहिंग्लज, निपाणी, बेळगाव, सौंदत्ती, कोल्हापूर, सांगली, गोव्यातील मंगेशी येथे सभा घेऊन या प्रथेविरोधात मोठी जनजागृती होत होती. अशा या चळवळीत राजन गवस यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. वरील कादंबरीलेखनाला या चळवळीतील अनुभवाची पार्श्वभूमी आहे.

'धिंगाणा' (१९९२), 'कळप' (१९९७) आणि 'तणकट' (१९९८), ‘ब, बळीचा’ (२०१२) या चार कादंबऱ्यांचा त्यांच्या लेखनाच्या संदर्भात दुसरा टप्पा मानावा लागेल. पहिल्या टप्प्यातील 'चौंडकं' व 'भंडारभोग' या दोन कादंबऱ्या लेखनामागे देवदासींच्या अनिष्ट चालीचे, रूढीचे चित्रण करून खेड्यातील दैवत व्यवस्थेतील शोषणयंत्रणा उघड्या करणे हे उद्दिष्ट होते. या शोषणाच्या रूढी-परंपरा नष्ट व्हाव्यात व देवदासींना माणूस म्हणून मुक्ततेचा मोकळा श्वास घेता यावा, या प्रेरणेतून हे लेखन झाल्याचे दिसून येते. संवेदनशील लेखक म्हणून, स्वतःमधील आंतरिक प्रेरणेच्या निकडीतून हे लेखन आल्याचे स्पष्ट दिसून येते; पण दुसऱ्या टप्प्यातील तिन्ही कांदबऱ्यांना मात्र साठोत्तरी कालखंडात कृषिकेंद्रित समाजजीवनात झालेल्या स्थित्यंतरांची व समकालीन लेखकांच्या वैचारिक प्रभावांची पार्श्वभूमी आहे. भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये व रंगनाथ पठारे या प्रतिभावंत कादंबरीकारांच्या कादंबरीलेखनाचा प्रभाव राजन गवस यांच्यावर आहे. ते भालचंद्र नेमाडे यांना 'लेखकांचे लेखक' म्हणून संबोधित करतात. भाऊ पाध्ये यांच्या समग्र साहित्यावर त्यांनी पीएच. डी. पदवीसाठी संशोधन केले आहे. या संशोधनातील कथा व कादंबरीलेखनावर झालेल्या संशोधनाचे दोन स्वतंत्र ग्रंथही प्रसिद्ध झाले आहेत. शिवाय भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' नंतरच्या चार कादंबऱ्यांविषयी समीक्षणात्मक लेखांचे 'चांगदेवचतुष्ट्यासंबंधी' (२००१) व रंगनाथ पठारे यांच्या साहित्याविषयी 'तिरकसपणातील सरळता' (१९९५) या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे संपादन केले आहे. यावरून त्यांच्या आस्थेचे लेखक आणि चिंतनाचे विषय कोणते होते, ते लक्षात येते.

उच्चशिक्षण घेऊनही तरुणाईला आलेली विफलता त्यांनी 'धिंगाणा'तून टिपली आहे. ऐंशीच्या दशकानंतर महाराष्ट्रातील कोणत्याही खेड्याचे उदाहरण घेतले तर ते कमी-अधिक प्रमाणात या प्रकारची वास्तविकता दिसून येते. राजकारण, समाजकारण व सहकार यात आलेला भंकसपणा त्यांनी तपशीलवार चित्रित केल्याचे दिसून येते. 'कळप' मधील रघू चिलमी या संवेदनशील तरुणाने समाजव्यवस्थेतील साहित्यविषयक कंपूशाहीची तपासणी करून दिलेली तिरकस प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. समाज, साहित्य

व संस्कृती यात आलेला भंपकपणा रघू चिलमीला दिसतो. हे वर्तमान वास्तव फक्त माझ्याबाबत घडलं का माझ्या पिढीबाबत, हे सांगणं रघूला कठीण होऊन जातं. या प्रश्नाचं उत्तर रघूला मिळत नाही.

'तणकट' या साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरीचे विशेष महत्त्व आहे. ग्रामीण व दलित कादंबरीची भेदरेषा अस्पष्ट करणारी ही कादंबरी गाव आणि गावकुसाबाहेरील जीवनातील ताण-तणाव चित्रित करते. कबीर कांबळे हा महाविद्यालयीन शिक्षण घेणारा संवेदनशील आणि समंजस तरुण आहे. गावपातळीवरील सवर्ण व दलितांचा ढोंगी-दुटप्पीपणा पाहून तो संतापतो. समूहभाव व सहानुभाव हे मूल्य घेऊन जगणाऱ्या कृषिकेंद्रित व्यवस्थेला तडे जाताना पाहून तो अस्वस्थ होतो. त्याची ही अस्वस्थता वाढत जाते. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांपासून दलित नेत्यांनी घेतलेली फारकत हे आजचे वर्तमान वास्तवच या कादंबरीने टिपले आहे. स्वार्थ व सवंग वृत्तपत्रीय प्रसिद्धीच्या हव्यासापोटी नेतृत्व करणारी माणसे दलित-सवर्ण संघर्ष निर्माण करून, राजकीय लाभ उठवतात त्यामुळे गावच्या समूहभावनेला तडे जातात. यासंदर्भात बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीचे तपशिलासह चित्रण करून कृषिकेंद्रित ग्रामव्यवस्था कशी पोखरली जात आहे; याचे वर्तमान वास्तव लेखकाने उलगडून दाखविले आहे. बाळासाहेब शेडबाळेसारख्या ढोंगी माणसाने निर्माण केलेल्या तणकटच्या रूपाने राजकारणाचे विद्रूप ढग अचानक जमा होतात आणि सगळीकडून काळवंडून येते, याची जाणीव ही कादंबरी करून देते. 'ब, बळीचा' (२०१२) ने कादंबरीरचनेचा आकृतिबंध अधिक विस्तृत केला आहे. तीत राजन गवस यांनी आशय–विषय व रचनेच्या दृष्टीने अनेक प्रयोग केले आहेत. या कादंबरीने मराठी कादंबऱ्यांच्या वाटचालीत स्वतंत्र पथ निर्माण केला आहे. रचनाबदल जसा ठळक आहे, तसा आशयसूत्राचा घाटही अधिक मजबूत आहे. कृषीजनसंस्कृतीच्या उद्ध्वस्तीकरणाचा अगदी खोलवर जाऊन वेध घेण्यात आला आहे. शेतीव्यवस्थेवरील संकटाचा शोध घेता, शासन, विविध संस्था, विचारवंत, संशोधक, अर्थतज्ज्ञांनी केलेली गफलत या कादंबरीत जाणवत नाही. ती प्रश्नांना विविध तपशिलांसह थेट भिडते.

वरील सहा कादंबऱ्याशिवाय राजन गवस यांचे 'रिवणावायली मुंगी' (२००९) व 'आपण माणसात जमा नाही.' (२००९) हे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. डॉ. रणधीर शिंदे यांनी राजन गवस यांच्या काही निवडक कथांचा एक संग्रह 'ढव्ह आणि लख्ख ऊन' (जुलै, २०१०) ग्रंथरूपाने संपादित केला आहे. या संग्रहात तेरा कथा आणि तीन ललित गद्यांचा समावेश आहे. या संग्रहात राजन गावास यांच्या साहित्याचे मूल्यमापन करणारी, लेखकाची मूल्यात्मक दृष्टी शोधणास मदत करणारी प्रदीर्घ अशी प्रस्तावना या ग्रंथास लाभलेली आहे.

'साधना', 'सकाळ', 'सत्याग्रही', 'साप्ताहिक सकाळ', 'अनुभव', 'तरुण भारत', 'बखर', 'महाराष्ट्र टाईम्स', 'स्त्री', 'किर्लोस्कर' इत्यादी नियतकालिकांतून यापूर्वी या कथा प्रकाशित झालेल्या आहेत. या बहुसंख्य कथेच्या केंद्रस्थानी स्त्रीविषयक मूल्यात्मक जाणीव आहे. समाजव्यवस्थेतील पारंपरिक स्त्रीच्या रूपापेक्षा वेगळ्या विचाराची बंडखोर प्रवृत्तीची स्त्री त्यांनी चित्रित केली आहे. यानिमित्ताने जात, धर्म, पंथ, रूढी-परंपरा यात असणारा भंपकपणा या कथा उलगडून दाखवतात. निवेदनातील तिरकसपणा हे कथनपद्धतीचे वेगळेपण तर आहेच; पण लोककथेच्या सादरीकरणाचा चांगला उपयोग या कथेतून केलेला आहे. ही कथा वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने वर्तमान समाजजीवनातील एकेक समस्या मुखर करताना दिसते. 'आपण माणसात जमा नाही'तील कथेतून शिक्षण-नोकरीमुळे ग्रामीण जीवनापासून पारख्या झालेल्या माणसांची तगमग चित्रित झाली आहे. साठीत जन्मलेल्या व ऐंशीच्या दशकात नोकरी करत असलेल्या तरुणांपेक्षा

सत्तर-ऐंशीच्या दशकात जन्मलेल्या तरुणांचा मानसिक संघर्ष वेगळा आहे, असा हा टोकदार संघर्ष अनेक कथांतून येतो. कृषिजन संस्कृतीला बसत असलेले हादरे, राजकारण, सहकार व्यवस्थेने आणलेला विद्रूपपणा, व्यक्तिकेंद्रित जीवनपद्धती, अर्थकेंद्रित विचारसरणी, भोगवादी-चंगळवादी संस्कृती या सर्वांचे चित्रण या कथेच्या माध्यमातून आलेले आहे. खेडूतांचा समूहभाव, सहानुभाव, त्याग, परोपकार, दया, पशु-पक्षी, प्राणी यांच्याविषयीचा आत्मीयभाव लोप पावत चालला, तर स्वार्थ कमालीचा बोकाळला. त्यामुळे इतरांकडून ओरबाडून घेणे, लुबाडणे हाच धर्म बनत चालला. पूर्वीच्या एका समर्थ व समृद्ध व्यवस्थेला आलेला बकालपणा चित्रित करून वर्तमान जीवनातील अस्वस्थ गावगाड्याचा बदलता अवकाश आपल्यासमोर या निमित्ताने ठेवला आहे.

'काचाकवड्या' (२००५, 'रोकडे पाझर' (२००९) व 'कैफियत', (२०१०) हे तीन ललितगद्यपर ग्रंथ प्रकाशित आहेत. दै. 'सकाळ' व दै. 'केसरी' मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रासंगिक लेखांचा संग्रह 'काचाकवड्या' ग्रंथातून प्रकाशित झालेला आहे. आत्मनिष्ठ स्वरूपाच्या या लेखांतून काही मौलिक विचार लेखकांनी मांडले आहेत. या संग्रहातून आपल्या आजूबाजूच्या परिसरात घडणाऱ्या घटनांची तात्त्विक चिकित्सा एका संवेदनशील कलावंताच्या लेखणीतून अवतरताना दिसून येते. 'रोकडे पाझर' हा ग्रंथ संतसाहित्यातील गुरू-शिष्य परंपरेचे चिंतन घेऊन येतो. चक्रधर-महदंबा, नामदेव-जनाबाई व तुकाराम-बहिणाबाई या गुरू-शिष्य परंपरेचे भावविश्व उलगडून दाखविले आहे. 'कैफियत' या साधना प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या ललितगद्यात एकूण ३५ लेख असून, यातील काही लेख हे 'साधना' या नियतकालिकातून यापूर्वीच प्रकाशित झालेले आहेत. बधिर झालेल्या समाजव्यवस्थेची एक स्वसाक्षांकित दस्तऐवजरूपी कैफियत यातून मांडली आहे. पशू-पक्षी, प्राणी, झाडे यांसकट साऱ्यांचं अस्तित्व धोक्यात येत असताना माणूस मात्र संवेदना हरवून बसतो आहे. आम्हाला रागही येत नाही आणि संतापही येत नाही, अशा जीव असलेल्या; पण संवेदना नसलेल्या 'मुडदे' पणाची जाणीव या लेखांनी करून दिली आहे.

कथा, कादंबरी, काव्य, ललितगद्य या वाङ्मयप्रकार लेखनाबरोबरच 'मराठीचे आशययुक्त अध्यापन' (१९९५) ही शिक्षकांसाठी मार्गदर्शिका व संशोधनात्मक स्वरूपाच्या 'तृतीयपंथीयांची बोली' (२००८), 'सीमा भागातील मराठी बोली' (२०१०) ही ग्रंथसंपदाही प्रकाशित आहे. साहित्य अकादमीच्या पुरस्कारांसह साहित्य क्षेत्रातील मानाचे समजले जाणारे अनेक पुरस्कार त्यांना लाभलेले आहेत. २०१० मध्ये नगर येथे झालेल्या कॉ. अण्णा भाऊ साठे दुसऱ्या मराठी साहित्य संमलेनाच्या अध्यक्षपदासह विविध साहित्य संमेलनांचे अध्यक्ष, वक्ता म्हणूनही भूमिका पार पाडलेली आहे. याशिवाय 'परिवर्तनाचा मुराळी' या नियतकालिकातून आपल्या भूमिकेचा स्वतंत्र ठसा उमटविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. दै. सकाळ च्या 'सप्तरंग' या रविवार पुरवणीमधून 'लोकल आणि ग्लोबल' या सदराखाली वर्षभर लेखन केले आहे. या सर्व लेखनातून स्वतंत्र स्वरूपाची एक भूमिका असलेली विचारधारा दिसून येते. यात सामाजिक उत्तरदायित्वाची भावना तर आहेच; पण कृषिजन संस्कृतीच्या व्यवस्थेकडे पाहण्याची एक मर्मग्राही स्वरूपाची दृष्टी दिसून येते.

लेखक, वक्ता, पत्रकार, प्राध्यापक व सामाजिक संस्थात्मक चळवळीतील कार्यकर्ता या भूमिकेबरोबरच एक समाजव्यवस्थेतील संवेदनशील तत्त्वचिंतक म्हणून ते आपल्यासमोर येतात. सामाजिक जाणिवांच्या भावनेतून केलेल्या त्यांच्या लेखनाला विशिष्ट स्वरूपाची एक भूमिका आहे. ती म्हणजे भूमिनिष्ठ भूमिका होय. त्यांच्या एकूण लेखनाचा विचार केला तर या भूमिकेचा प्रत्यय आल्याशिवाय राहत

नाही. वेळोवेळी केलेल्या वृत्तपत्रीय लेखनाबरोबरच विचारपीठावरूनही आपल्या भूमिकेच्या संदर्भात त्यांनी मांडणी केली आहे. 'साहित्य आणि समाज' या प्रा. गो. मा. पवार गौरवग्रंथात लिहिलेल्या 'कृषिजन संस्कृतीचे साहित्य' या लेखातून सूत्रबद्ध स्वरूपात आपली भूमिका त्यांनी विशद केली आहे.

राजन गवस यांचा एक सिद्धहस्त लेखक म्हणून मोठा लौकिक आहे. सामाजिक व संस्थात्मक चळवळीतील कार्यकर्ता, प्रसिद्ध वक्ता, काही काळ पत्रकारिता आणि पुढे व्यवसायाने प्राध्यापक झालेल्या राजन गवस यांची सर्जनशीलता अजूनही नवं-नवं काही लिहिण्यात व्यस्त आहे. ते सतत लिहीत असतात. 'साधना' साप्ताहिकातून विविध विषयावरील लेख सतत प्रकाशित होत आहेत. नुकतेच 'सकाळ'च्या रविवार पुरवणीत 'लोकल आणि ग्लोबल' हे सदर वर्षभर चालले. कृषिसंस्कृतीची ज्ञानव्यवस्था आणि तेथील भूमिनिष्ठ जीवन जगणाऱ्या भूमिनिष्ठांच्या जीवनजाणिवा त्यांनी तळमळीने मांडल्या आहेत. एकूणच त्यांच्या लेखनाकडे तटस्थतेने पाहिल्यावर असे जाणवते, की त्यांचे लेखन सामाजिक उत्तरदायित्वाच्या, भूमिदायित्वाच्या भावनेने झालेले आहे. कृषिजन व्यवस्थेची, त्यांच्या ज्ञानव्यवस्थेची नीटपणे, एकत्रित मांडणी तत्पूर्वी कुणी केलेली नव्हती, ती त्यांनी केली आहे.

राजन गवस यांच्या साहित्याच्या आशय- विषयातील वैविध्य, मांडणीतील कलात्मकता आणि मूल्यात्म दृष्टिकोन या सर्व बाबी मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारित करणाऱ्या आहेत. त्यांच्या साहित्यलेखनाने मराठी साहित्यात महत्त्वाची आणि मोलाची भर घातली आहे. एकूणच त्यांची भूमी-भूमिका आणि त्यांचे साहित्य यांच्यात आंतरिक अनुबंध असल्याचे दिसते. त्यात मूल्यात्म सामाजिक जाणिवेचे तत्त्व अनुस्यूत आहे. भूमिनिष्ठ भूमिकेचे सजग भानही आहे. याच आधारावर ऐंशीनंतरच्या मराठी साहित्यात त्यांनी स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आपल्या कादंबरीलेखनाने मराठी कादंबरीविश्वाला महत्त्वाचे योगदान दिले आहे.

अलिडच्या काळातील एक मूल्यात्म दृष्टिकोन असणारा, वृत्तिगांभीर्याने लेखन करणारा, सामाजिक ऱ्हासशीलतेमुळे व्यथित होणारा, लिहिणे आणि जगणे यात कमीत कमी अंतर असणारा, परंपरेतील कथनपरंपरांचा योग्य वापर करणारा आणि आपले कथात्म व कथनात्म साहित्य एका कलात्मक उंचीवर घेऊन जाणारा महत्त्वाचा लेखक म्हणून राजन गवस यांचा उल्लेख करावा लागतो.

**वाङ्मयीन जडणघडण आणि साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा:-**

साहित्य आणि समाज यांचा अनुबंध हा व्यामिश्र स्वरूपाचा असतो. ‘तेन’ या फ्रेंच लेखकाने वंश, काळ व परिस्थिती या घटकांनी साहित्यव्यवहार नियंत्रित होतो हे सांगितले; पण साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते, या मताचाही त्यांनी पुरस्कार केला. साहित्य हे सामाजिक दस्तऐवज असल्यामुळे साहित्याचा आणि सामाजिक संदर्भाचा अनुबंध विचारात घेऊन समाजवास्तवाचा शोध घेणे शक्य आहे. कारण कोणतीही साहित्यकृती ही त्या समाजाची साक्षीदार असते. समाजातूनच तिची निर्मिती होत असते आणि समाजासाठीच तिचा उपयोग होत असतो. म्हणजेच सामाजिक स्थितिगतीचे विश्लेषण करावयास साहित्य उपयोगी तर ठरतेच; पण त्या समाजातील विविध वृती-प्रवृत्तीचे नव-नवीन संदर्भही त्यातून आलेले असतात.

साहित्यिक हा व्यापक समाजव्यवस्थेचा विचार मांडत असतो. तो काही केवळ वैयक्तिक अनुभवातून आलेल्या जाणिवा मांडत नाही तर व्यापक स्वरूपाचे वर्तमान वास्तव संदर्भही साहित्यात आलेले असतात. असे वर्तमानकालीन सर्व संदर्भ राजन गवस यांच्या साहित्यात आलेले आहेत.

राजन गवस हे कोल्हापूर-गडहिंग्लज परिसरातले आहेत. ही त्यांची भूमी असून याच भूमीचे संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. ती भूमी आणि तो काळ या दोन... डोळसपणे पाहिले तर राजन गवस यांच्या साहित्याच्या प्रेरणा समजून घेण्यास मदत होते. लेखक ज्या भौगोलिक क्षेत्रात वावरतात त्या भौगोलिक क्षेत्रात शेकडो वर्षांपासून देवदासींची प्रथा आहे. मुळात ती कर्नाटकातून आलेली प्रथा आहे. या प्रथेसंदर्भात मराठीमध्ये फार कमी लिहिले गेले. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील सौंदत्तीची 'यल्लम्मा' ही देवता फार कडक समजली जाते. या देवतेचा या परिसरावर मोठा प्रभाव राहिलेला आहे. भीतीपोटी, श्रद्धेने, अज्ञानामुळे व धर्मव्यवस्थेच्या प्रभावामुळे दरवर्षी हजारो मुली देवीला वाहिल्या जात. त्यांचे 'कारण' केले जायचे. एकदा देवीसोबत लग्न झाले, की पुन्हा लग्न करता येत नाही, अशी ही प्रथा आहे. देवदासी म्हणजे देवीची दासी असा समज असून देव सर्वांचा तसेच देवदासीही सर्वांची. म्हणजे तिच्यावर गावची मालकी समजली जाते. त्यामुळे देवदासीवर सर्वांचा हक्क समजला जातो. एकदा ही प्रथा एखाद्या घरी सुरू झाली, की ती पिढ्यानपिढ्या चालविली जाते. महाराष्ट्रातील सांगली, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांबरोबरच कर्नाटकातील धारवाड, बेळगाव, विजापूर व गुलबर्गा या जिल्ह्यांमध्ये ही प्रथा मोठ्या प्रमाणात असून, बहुजनांच्या सर्व जाती-धर्मामध्येही ही प्रथा असल्याचे दिसून येते. या प्रथेच्या देवतेबद्दल लोकमानसात जबरदस्त भीती असल्यामुळे त्या संदर्भात काही बोलणेही पाप समजले जायचे.

याच प्रभावग्रस्त क्षेत्रातील राजन गवस असल्यामुळे देवदासींचे दुःख त्यांनी जवळून अनुभवले होते. त्या काळात देवदासी मुक्तीची फार मोठी चळवळ प्रा. विठ्ठल बन्ने या पुरोगामी विचाराच्या चळवळ्या प्राध्यापकाने उभी केली होती. राष्ट्र सेवादलाच्या कार्यक्रमात प्रा. विठ्ठल बन्ने आणि जनता दलाचे आमदार श्रीपती शिंदे यांचा परिचय झाला. प्रा. बन्ने हे तर त्या काळात अनेक संघटना चालवत. त्याविषयी राजन गवस सांगतात, "बन्ने सरांच्या नवनव्या संघटना. कधी माकडवाले, कधी भंगारवाले, कधी गोसावी, कधी बेरड तर कधी भंगी. त्यांचा उत्साह प्रचंड. महाराष्ट्रात ज्या ज्या चळवळी नंतर फार गाजल्या, ज्यांनी स्वतःचा आकार धारण केला, त्याच्या कैक आधी गडहिंग्लजमध्ये त्या त्या प्रश्नांवर बारीक का असेना, मोर्चा निघालेला आहे; पण त्याची नोंद कुठेच नाही. बन्ने सर आणि श्रीपती शिंदे यांना मोर्चे काढायचा नादच होता." [१६] या प्रा. विठ्ठल बन्ने यांनी उभ्या केलेल्या विविध चळवळीसोबत राजन गवस राहिलेले आहेत. त्यात देवदासी मुक्ती चळवळीत त्यांचा १९७५ ते १९८९ या काळात सक्रिय सहभाग राहिलेला. याच काळात देवदासीचे भयावह जीवन अनुभवता आले. पुढे १९८५ मध्ये लिहिलेल्या 'चौंडकं' कादंबरीला या चळवळीची पार्श्वभूमी आहे. यासंदर्भात दि. २३ ऑक्टोबर २००२ रोजी मुंबई मराठी साहित्य संघ आणि 'अभिनव भाषाभ्यास केंद्र' यांच्या वतीने डॉ. भानुभाई नानावटी कलाघर, गोरेगाव येथे सतीश काळसेकर यांनी घेतलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, "एफवायला असताना देवदासींच्या चळवळीत ओढला गेलो. आमचे प्रा. विठ्ठल बन्ने आणि आताचे जनता दलाचे अध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांनी चळवळ सुरू केली. त्यावेळी आम्ही विद्यार्थी होतो... आम्हाला बन्ने सरांनी सांगितलं, की तालुकाभर हिंडायचं आणि तालुक्यात किती जोगतिणी आहेत याची मापणी करायची. आम्ही सायकली घेऊन प्रत्येक गावात जायचो... सगळ्या प्रश्नांच्या आस्थेतून, तळमळीतून आमचे सर, श्रीपतराव शिंदे आणि आम्ही हे सर्व करत होतो."[१७]

तत्कालीन देवदासी मुक्ती चळवळीच्या रेट्यामुळे या प्रश्नाची महाराष्ट्रभर चर्चा होत होती. त्यामुळे पुणे-मुंबईसारख्या महानगरांतली पत्रकार, लेखक मंडळी देवदासींच्या जीवनावर लेख लिहायचा म्हणून या प्रभावग्रस्त क्षेत्रात येत असत; पण ही मंडळी काहीतरी चुकीच्या समजुतीतून त्यावर लिहू लागली. देवदासी म्हणजे वेश्या अशी काहीतरी त्यांची समजूत असायची. त्यावेळी असा घडलेला एक प्रसंग आणि त्यातून एका कादंबरीची निर्मिती झाल्याचे राजन गवस यांनी एका मुलाखतीत सांगितले आहे. राजन गवस सांगतात, "एक गृहस्थ आमच्याकडे आले आणि म्हणाले, देवदासीसंदर्भात मला लिहायचं आहे. बन्ने सरांनी लगेचच सांगितलं. जा रे ह्यांना या गावात घेऊन जा आणि अमकीची भेट घालून द्या. त्या गावाला जा आणि तमकीबरोबर बोलायला लावा. आम्ही तिथल्या एका हसरचंपू नावाच्या गावामध्ये आधी गेलो. एका देवदासीच्या घरी हा गृहस्थ बोलता बोलता, गप्पा मारता मारता मला म्हणाला, 'तू बाहेर जा', मी घराबाहेर गेलो. चक्क या बाईला त्या माणसानं विचारलं, 'तुम्ही धंदा करता का?' ती बाई असली संतापली, चवताळली, की तिनं गळपट्टीलाच हात घातला. हा ओरडला. मी पळत जाऊन पाहतो तर हा थरथरत उभा. ती म्हणाली, 'अरे! या कुठल्या भाड्याला घेऊन आलास इथं? आणि मला इचारतो काय?' असा हा प्रसंग. मी गळाठून गेलो. त्या बाईचं जगणं इतके वेदनेनं भरलेलं आहे आणि हा नेमकं विचारतो काय आहे!"[१८] अशी चुकीची समीकरणं घेऊन, रुचिपालट किंवा ग्लॅमर म्हणून देवदासीचे चित्रण काही लोक करत होते. त्या काळी अनिल अवचट, बाबा आढाव वगळले तर अनेकांनी देवदासींचा प्रश्न नीट मांडलेला नव्हता. धर्मसंस्थेच्या बळी ठरलेल्या देवदासींना स्वेच्छेने व्यवसाय करणाऱ्या ह्या बायका असं काहीसं समजून छापून येत होतं. खरं म्हणजे ही लोकांची खोटी समजूत होती. त्यांचं वेदनेनं भरलेलं जीवन लेखक जवळून अनुभवत होते; पण एके दिवशी असेच खोट्या समजुतीतून छापून आलेला लेख वाचत असताना त्यावरून मित्रा-मित्रांत भांडण झाले. त्यासंदर्भात राजन गवस पुढे म्हणतात, "एके दिवशी आमच्या मित्रांच्यामध्ये कडाक्याचं भांडण झालं. हे लोक काहीही लिहितात आणि आपण काहीही वाचतो. तर त्यातला एक मित्र म्हणाला, तुझ्यासारख्यानं कथा, कविता, लिहिणाऱ्यानं हे काहीतरी लिहायला हवं. त्या क्षणी मी लिहायला लागलो असं नाही; पण पुढं असं डोक्यात येत गेलं आणि १९८५ मध्ये 'चौंडकं' नावाची कादंबरी आली, की ज्यातून हा प्रश्न नीट मांडण्याचा प्रयत्न केला."[१९]

१९८९ मध्ये 'भंडारभोग' नावाची कादंबरी प्रकाशित झाली. तत्पूर्वी याच विषयावर 'खांडूक' नावाची कथा 'साहित्य शिवार' च्या १९८६ सालच्या दिवाळी अंकात छापून आली होती. तेच कथेचे बीज तपशिलासह व संदर्भासह 'भंडारभोग' मधून आले आहे. देवदासींपेक्षाही भयावह जीवन जगावं लागणाऱ्या जोगत्यांची व्यथा या कादंबरीतून मांडली आहे. देवदासींना झुलवा तरी लावता येतो; पण जोगत्यांचं दुःख वेगळ्या जाणिवेचे असते. अशा जोगत्यांची म्हणजे 'तायाप्पा'ची कहाणी 'भंडारभोग' मधून प्रातिनिधिक स्वरूपात येते. हा तायाप्पा लेखकांनी बालपणी अनुभवलेला शिपूर गावचा जोगता असून, तो बाजारला जाता-येता अत्याळला थांबत असे. तो कोंबड्यांचा व्यापार करत असे. तो मुक्कामाला थांबला, की त्याच्या सोबत गावभर भटकणं, हा बालसुलभवयातील राजन गवस यांचा उद्योग चालायचा. त्यालाच उद्देशून पुढे 'भंडारभोग' ची अर्पणपत्रिका लिहिली. ती अशी -

"तायाप्पा -
लहानपणी तुझ्या पदराला धरून
एक एक घर हिंडायचो - तेव्हा तू 'बापय' असूनही

अंगावर 'लुगडं' का, हा प्रश्न पडायचा...
आज फक्त तुझ्या पदराआडलपलेली
हुंदक्यांची वारुळं दिसतात.
म्हणून हे सर्व तुला आणि... तुझ्यासारख्या असंख्यांना..."[२०]

शिपूरचा जोगत्याच्या व्यथा - वेदना जवळून पाहता, अनुभवता आली. त्याच्या दुःखभोगाला भंडारभोगच्या निमित्ताने वाचा फोडण्याचे प्रातिनिधिक कार्य राजन गवस यांनी केले. या प्रथेतील फोलपणाबद्दलची खदखद आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून हे कार्य त्यांच्या हातून घडले. या मागे उपेक्षितांच्या दुःखाला वाचा फोडण्याची एक आंतरिक प्रेरणा होती. पुढे कधीतरी दादू नावाचा एक जोगता भेटला. त्याची व्यथा देखील अशीच शिपूरच्या जोगत्यासारखी होती. असे शेकडो जोगते अंधश्रद्धाळू, धार्मिक व्यवस्थेने कसे नपुंसक केले जातात, हे लेखकांनी जवळून पाहिले होते. त्याविषयी सांगताना ते लिहितात, "यल्लमादेवीला पुरुष जोगते कसे वाहिले जातात, हे प्रारूप स्वीकारून व्यवस्था माणसाला कशी नपुंसक करते, याचा शोध सुरु केला. दादू आणि त्याचे अनेक जोगते मित्र माझ्या मदतीला धावून आले. 'भंडारभोग' आकाराला आली. तृतीय पंथीयांचं जगण्याचं वास्तव कल्पितात स्थित्यंतरित करून मला माझ्या भोवतालच्या वर्तमानाविषयी काही म्हणायचं होतं, ती माझी आंतरिक निकड होती."[२१]

शोषण आणि दुःख हे माझ्या साहित्याचं सूत्र आहे, असे राजन गवस आपल्या साहित्याविषयी सांगत आले आहेत. 'देवदासी मुक्ती चळवळी'त दीर्घकाळ काम केल्यामुळे देवदासींच्या वाट्याला आलेले दुःख त्यांनी जवळून पाहिलेले होते. धर्मभोळेपणा, श्रद्धाळूपणा, अज्ञान, परंपरा यांमुळे ही प्रथा ज्या भौगोलिक क्षेत्रात आहे त्याला शेकडो वर्षांची परंपरा आहे. ही अनिष्ट रूढी-प्रथा नष्ट व्हावी, म्हणून चळवळ उभी राहिली होती. राजन गवसही या चळवळीत होते. या चळवळीला बळ प्राप्त व्हावे या आंतरिक हेतूने जोगते-जोगतिणीचे प्रश्न साहित्यातून मांडण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. दोन कादंबऱ्या व काही कथांतून हा प्रश्न नीट मांडण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून झाला आहे. तत्कालीन परिस्थितीत काही अपवाद सोडल्यास रूचिपालट म्हणून किंवा वृत्तपत्रीय ग्लॅमर म्हणून अनेकजण चुकीच्या पद्धतीने देवदासी प्रथेचे चित्रण करत होते. वास्तव स्वरूप चित्रित करून या देवदासी जीवनाकडे, त्यांच्या प्रथांकडे पाहण्याची दृष्टी विकसित करावयाची होती. या दुःखभोगाला वाचा फोडायची होती. या आंतरिक अनिवार्यतेच्या अस्वस्थतेतून लेखकाला प्रेरणा मिळाली. दुःखाला वाचा फोडणारा हा परिवर्तनवादी विचार म्हणजे उपेक्षितांच्या जीवनाकडे लेखक कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो तो दृष्टिकोन आणि लेखनामागची प्रेरणा या दोन्ही बाबी स्पष्ट होतात.

व्यक्ती म्हणून असणाऱ्या व्यक्तिमत्त्वास वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडण्याची प्रक्रिया हायस्कूलमध्येच घडत होती. 'अत्याळ' गावी हायस्कूलमध्ये असतानाच कवितांलेखनाला प्रारंभ झाला. शाळेतील शिक्षकांनी कविता लिहिण्याला जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रेरणेमुळे, प्रोत्साहनामुळे कविता लिहिली जाऊ लागली. शिक्षक जाणीवपूर्वक चांगल्या पुस्तकांचे वाचन करून घेत असत. या शिक्षकांतील कवी असणारे मदन हजेरी हे तालुक्याहून चांगली पुस्तकं आणून देत असत. त्याचे वाचन करून घेत. या वाचनाबरोबरच कीर्तन, सोंगीभजन, तमाशा या देशी परंपरेच्या लोककलेतून कलेचे आणि सादरीकरणाचे, त्याच्या वैविध्यतेचे अनुभवविश्व समृद्ध होत गेले. लेखक म्हणून जडणघडणीस हा टप्पा महत्त्वपूर्ण होता. लेखनाची प्रेरणा या शालेय जीवनापासूनच मिळत गेली.

शालेय जीवनापासून मिळालेली प्रेरणा महाविद्यालयातही कायम राहिली. गडहिंग्लजच्या महाविद्यालयीन काळात शिवराज महाविद्यालयाचे प्राचार्य बळवंत देशमुख हे एक जाणकार समीक्षक होते. लिहिणाऱ्या मुलांना प्रोत्साहन द्यायचे. पुस्तकांच्या सुविधांची उपलब्धता, लिहिणाऱ्याचे जाहीर कौतुक आणि बक्षिसे यांमुळे महाविद्यालयीन युवक असणाऱ्या राजन गवस यांना प्रोत्साहन मिळायचे. याच काळात 'उचकी' नावाची कथा जून १९८१ च्या 'सत्यकथे'ने छापली. या कथेचे सर्वत्र कौतुक झाले. लिहिण्यासाठी आत्मविश्वास आणि आत्मिक बळ मिळाले. पुढे एम. ए. ला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे प्रवेश मिळाला. या काळात झालेल्या महत्त्वपूर्ण चर्चासत्राच्या निमित्ताने भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे, गंगाधर गाडगीळ, विद्याधर पुंडलिक यांसारखी मातब्बर मंडळी पाहता-ऐकता आली. दर्जेदार वाङ्मयीन कलाकृतीचा परिचय झाला. या चर्चासत्राने आपली वाङ्मयीन दृष्टीच कशी बदलून गेली हा अनुभव कथन करताना राजन गवस सांगतात, "त्या आधी कुठंही बारकं संमेलन, शिबिर असलं, की खांद्यावर शबनम टाकून आम्ही पळायचो. व्यासपीठावर टाळयाखाऊ भाषणांना दादही द्यायचो. टाळया मिळवणाऱ्या कविता पाठ करायचो. शिबिरात कथा कशी लिहावी, अनुभव कसा फुलवावा, टोक कसे काढावं, असं बरंच काय काय ऐकून भारावून जायचो, पण हे सगळंच या चर्चासत्रानं थांबवून टाकलं. कोल्हटकर, डहाके, ढसाळ हे कवी आहेत, महत्त्वाची कविता लिहितात. हे ऐकून आपण आजवर काय वाचत होतो, असा प्रश्न पोखरू लागला. वाचनाची, विचार करण्याची सारी वर्तुळंच बदलली."[२२] शिवाय या काळात वाङ्मयीन जाण असणाऱ्या काही समवयस्क मित्रमंडळीशी लिहिण्या-वाचण्याबद्दल चर्चा व्हायची. यासंदर्भात एका मुलाखतीत राजन गवस म्हणतात, "त्या काळात सत्यकथा, अनुष्टुभमध्ये लिहिणारे मोहन पाटील, निशिकांत गुरव, सुमित्रा जाधव, बाबा मोहम्मद आत्तार हे मित्र सतत काही ना काही सांगत असायचे. त्यांच्याशी नित्य चर्चा असायची. याचा मात्र खूप फायदा झाला. हेच माझे वाङ्मयीन पर्यावरण."[२३]

अत्याळ हे राजन गवस यांचे आजोळ होय. याच गावात त्यांचे बालपण गेले. लिहिण्यासाठी याच गावानं त्यांना झपाटून टाकलं, असा प्रांजळ भाव व्यक्त करताना सारांशलेखनाचे धडे या गावाने कसे गिरवायला लावले, हा अनुभव सांगताना 'मी लिहिण्यामध्ये मुंबईचा फार मोठा वाटा आहे', असे नमूद करून ते म्हणतात, "आमच्या गावामध्ये घरटी एक माणूस मुंबईला असायचा - गिरणगावात काम करायचा, हे सगळे करी रोड, डिलाईट रोडला राहायचे, म्हणजे ही पुरुषमंडळी इकडे असायची आणि यांच्या बायका गावाकडे असायच्या. व्हायचं असं, की मी त्या अख्ख्या गावचा भाचा. मुंबईवाल्यांच्या बायका मला हळूच बोलावून घ्यायच्या आणि म्हणायच्या, 'अरे एवढं पत्र लिहून दे. इतरापेक्षा मी विश्वासू माणूस होतो त्यांचा. त्याचं कारण असं, की कोणी पत्र लिहिलंय ते दुसऱ्या कुणाला कळण्याची शक्यता नाही. व्हायचं असं, की सून यायची आणि नवऱ्याला पत्र लिही म्हणायची आणि सासू जाच कसा करते, टाकून कसं बोलते, शिळं कसं वाढते, काम किती करायला लावते, वगैरे... वगैरे आणि दुसऱ्या चार दिवसांनंतर या मुलाची आई मला सांगायची, ही सून कशी काम करत नाही. मला त्रास कशी देते आणि हे घर मला एकटीला कसं ओढावं लागतं आणि हा म्हातारा म्हणावा तर असा, तू तिकडं तसा आणि सून भेटलेली अशी. वगैरे वगैरे... त्या वेळी माझ्या लक्षात आलं, की एकाच घटनेकडे दोन वेगवेगळी माणसं कशी बघतात! हे जे काही अनुभवविश्व म्हणजे त्या कथा. बायकांच्या पत्रातून लिहायचो, त्यात दुसरी अडचण अशी असायची, की त्या भरभर सांगत जायच्या आणि ते सगळे पत्रात लिहिणं शक्य नसायचं. पुन्हा ते ऐकून घेणं पंधरा मिनिटं

आणि ते लिहिणं पाच मिनिटं म्हणजे अगदी सारांश लेखनाचे पहिले धडे मला माझ्या घरातल्या माम्यांनी दिले."[२४]

या आणि अशा संपन्न अनुभवांनी राजन गवस यांची वाङ्मयीन जडणघडण होत होती. साहित्य निर्मितीच्या प्रेरणा मिळत गेल्या, जाणिवा विकसित होत गेल्या.

ज्या कृषिसंस्कृतीच्या भूमीने लेखकाला घडविले त्या भूमीनेच लेखकाला लिहिण्याच्या प्रेरणा दिल्या. लेखनाला विषय दिले, आशय दिले, माणसं दिली, काळ दिला. अवकाश दिला. जाण दिली. भान दिले. याचे लेखकाने तीव्र सामाजिक भान ठेवून भूमिनिष्ठांच्या जीवनधारणा मांडल्या. उपेक्षितांच्या दुःखाला वाचा फोडली. हजारो वर्षांच्या जगण्याच्या संघर्षातून निर्माण झालेल्या कृषिसंस्कृतीच्या ज्ञानपरंपरेची व्यवस्था सांगितली. या कृषिजन व्यवस्थेवर नागर व्यवस्थेने केलेले आक्रमण दाखविले. चांगल्या परंपरांची आठवण दिली. शोषणाच्या परंपरांचा धिक्कार केला. बोथट झालेल्या समाजाला संवेदनशील पशुपक्ष्यांची तत्सम जैव पर्यावरणीय स्वरूपाची अधिवासशास्त्रीय भूमिका सांगितली. अशा एका भूमिनिष्ठ भूमिका असलेल्या लेखकाच्या लेखनाला एका संवेदनशील मानवतावादाची प्रेरणा आहे.

**राजन गवस यांच्या साहित्याची भूमी:**

मानव हा उत्क्रांतीच्या, विकासाच्या विविध अवस्थांतून पुढे गेला. निसर्गातील फळे, कंदमुळे, प्राण्याची शिकार, भटक्या टोळीची अवस्था, पशुपालन, अकुशल शेतीची अवस्था आणि प्रगत शेतीची स्थिर वस्ती करून राहण्याची अवस्था. या चार विकासाच्या अवस्थांतून जात असताना भूक, दुःख, संरक्षण आणि आधार या गोष्टीची पूर्तता केवळ भूमीमुळे होते आहे, याची जाणीव मानवाला फार पूर्वीपासून आहे. फळे, कंदमुळे यामुळे मिळणारे अन्न, नैसर्गिक गुहा, वृक्ष यामुळे मिळणारा विसावा या सर्व गोष्टी केवळ भूमीमुळे प्राप्त होतात याची जाणीव होती. त्यामुळे भूमीविषयी वाटणारा आदर, औदार्य मानवाने वेळोवेळी प्रकट केले आहे. भू, भूमी, वसुधा, धरणी, विश्वंभरा, धरित्री, धरती, मेदिनी अशा कितीतरी अर्थपूर्ण नावांनी या भावना मानवांकडून वेळोवेळी व्यक्त होतात.

मानव आणि त्याची भूमी यांचे नाते अनन्यसाधारण आहे. झाडाला जमिनीतून जसे पोषणद्रव्ये मिळतात तसे मानवाला त्या प्रदेशातल्या भूमीची पोषणद्रव्ये मिळतात, त्याबरोबरच तेथील पर्यावरण, विविध प्रकारची परिस्थिती मानवाच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणारे ठरते. जसे मानवाच्या भूमिसातत्याबरोबरच त्या प्रदेशातील रूढी-प्रथा, परंपरा, तेथील लोकजीवन, लोकसंकेत यांचा एक व्यापक प्रभाव त्या-त्या समूहगटावर, प्रदेशावर होत असतो. त्यामुळे प्रदेशानुसार वैविध्यता निर्माण होते. भिन्नत्व निर्माण होते. रुजणे ही संकल्पना भूमीशीच निगडित आहे. जो तो ज्याच्या त्याच्या भूमीतच रुजतो वाढतो-फुलतो. जागतिकीकरणाच्या सपाटीकरणासारखी उपरेपानाची ही प्रक्रिया नाही. म्हणून कोणत्याही भूमिनिष्ठ लेखकाची भूमी ही त्याच्याच अधिवासात (इकोसिस्टिम), जैविक स्वरूपाच्या अन्न-ऊर्जाचक्रात समाविष्ट असते. त्या लेखकाची भूमी आणि त्याचे साहित्य यात एकत्व असते.

राजन गवस यांच्या साहित्याची भूमी आणि कथानकाची अपरिहार्यता हे विशेष असल्याचे दिसून येते. व्यक्ती, त्याचे लेखन आणि त्या लेखनाचे आशयद्रव्य हे त्या भूमीशी एकनिष्ठ असणे म्हणजे भूमिनिष्ठ जाणीव होय. भाषेसह हे विशेष राजन गवस यांच्या साहित्यात आलेले आहेत.

राजन गवस यांच्या साहित्याची भूमी ही महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील आहे. त्यात काही भाग कर्नाटकाचाही येतो. या भूभागाचे असणारे संचित, येथील संस्कृती त्यांच्या साहित्यातून आलेली आहे. येथील भौगोलिक परिसर आणि त्या परिसरातील असलेली भूसांस्कृतिक वैशिष्ट्ये यांचा त्या माणसांच्या जगण्यावर होणारा परिणाम या साहित्यकृतीतून आविष्कृत झालेला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि नैसर्गिक पर्यावरणीय संवेदनांच्या स्वरूपाचे प्रभाव, लेखक म्हणून राजन गवस यांच्यावर झालेले आहेत आणि ते त्यांच्या साहित्यकृतीतून आविष्कृत झालेले आहेत.

देवदासीच्या जीवनपद्धतीवर, त्यांच्या दुःखभोगावर 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या दोन कादंबऱ्या राजन गवस यांनी लिहिल्या आहेत. ज्या देवदासीच्या दुःखवेदनांचे ते चित्रण करतात, त्या भौगोलिक क्षेत्रात देवदासीची समस्या शेकडो वर्षांपासून आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर 'यल्लम्मा' या देवतेचा फार मोठा प्रभाव राहिलेला आहे. निपाणीहून सुमारे ३० मैल अंतरावर असणाऱ्या 'सौंदत्ती' या यल्लम्मा देवतेच्या मंदिराकडे जाण्यासाठी संकेश्वरी, हुक्केरी, हत्तरगी, गोकाक, घटप्रभा, येरगट्टी, नोळ, मनोळी असा रस्ता आहे. यातील अनेक गावांचा भूवैशिष्ट्यांसह उल्लेख राजन गवस यांच्या साहित्यातून आलेला आहे. सौंदत्तीचे मंदिर हे बाराव्या- तेराव्या शतकातले असून या देवतेचा भीतिदायक प्रभाव या भूभागावर आहे. त्यामुळे कर्नाटकातील प्रदेशासह महाराष्ट्रात याचा प्रभाव राहिलेला आहे. महाराष्ट्रात सांगली, सोलापूर, कोल्हापूर तर कर्नाटकातील धारवाड, बेळगाव, विजापूर या जिल्ह्यांमध्ये देवदासीची प्रथा मोठ्या प्रमाणात होती. हजारो मुली दरवर्षी देवदासी म्हणून सोडल्या जात. सन १९८५ या एका वर्षात १५०० मुली देवदासी म्हणून सोडल्याची बातमी त्यावेळी 'केसरी' वृत्तपत्राने दिली होती.

१९७५ पासून देवदासी निर्मूलन चळवळ निपाणी, गडहिंग्लज या परिसरात सुरू झाली. या प्रदेशात समस्येचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात होते. प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ. सुभाष जोशी, श्रीपतराव शिंदे, डॉ. अच्युत माने, डॉ. आनंद वास्कर इत्यादी पुरोगामी विचारांच्या, उपेक्षितांच्या जीवनाविषयी तळमळ वाटणाऱ्या माणसांनी ही चळवळ उभी केली होती. या चळवळीत राजन गवस यांचा १९७५ ते १९८९ या काळात सक्रिय सहभाग राहिलेला आहे.

तत्कालीन परिस्थितीत या चळवळीमुळे देवदासीच्या जीवनाविषयी एक प्रसिद्धीचे वलय म्हणून काही पत्रकार, लेखकांनी चुकीच्या पद्धतीने समीकरण मनात ठेवून, लिहिले होते; ते फार चुकीचे होते. प्रा. विठ्ठल बन्ने, श्रीपतराव शिंदे हे देवदासी प्रश्नांच्या आस्थेतून काम करत असल्यामुळे या भागातील चळवळीकडे पूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले जात होते. मोठ्या प्रमाणावर प्रबोधन होत होते. कायदे करण्यासाठी सरकारवर दबाव निर्माण होत होता. त्याच काळात वर्तमानपत्रांतून लिखाण करणाऱ्या पुण्या- मुंबईच्या पत्रकारांनी, "देवदासी म्हणजे वेश्या असं एक समीकरण करून टाकलं."[२५] अशी नोंद दिसते. अनिल अवचट, बाबा आढाव यांच्यासारखे काही सन्माननीय अपवाद सोडले तर या समस्येचे खरे स्वरूप फारसे कुणाला माहीत नव्हते. त्यामुळे कुणीतरी जाणत्या माणसाने हा प्रश्न नीटपणे मांडणे आवश्यक होते. याच पार्श्वभूमीवर 'चौंडकं' ही कादंबरी येते. पुढे काही वर्षांनंतर जोगत्याच्या जीवनावर 'भंडारभोग' ही कादंबरी आली. काही प्रमाणात देवदासींचे जीवन अनेकांनी कथा-कादंबऱ्यांतून मांडले; पण जोगत्यांच्या जीवनावर त्यांच्या विधीसह, तपशिलासह त्यांच्या जीवनाचे दुःखभोग 'भंडारभोग' कादंबरीतून मांडले. समस्त जोगत्यांचे दुःख प्रातिनिधिक स्वरूपात या कादंबरीतून आले आहे. "पुरुष जोगत्याच्या जीवनावरील ही एकमेव कादंबरी आहे."[२६] हे डॉ. मदन कुलकर्णी यांनी नोंदविलेले निरीक्षण योग्य आहे.

'कळप', 'धिंगाणा' आणि 'तणकट' या तीनही कादंबऱ्यांचा विषय हे साठोत्तरी कालखंडात कृषिसंस्कृतीला या वर्तमान काळात बसलेला हादरा हाच आहे. राजकारण, सहकार आणि शिक्षण या सुधारणेच्या नावाखाली आलेल्या व्यवस्थेने ग्रामव्यवस्थेला कसे धक्के दिले आहेत, ग्रामव्यवस्थेचा समूहभाव आणि सहानुभाव कसा उद्ध्वस्त होत आहे; याचे तपशीलवार चित्रण या साहित्यकृतीतून आलेले आहे. ग्रामव्यवस्थेतली हरवत चाललेली संवदेनशीलता, दुभंगलेपण हे नेमकेपणाने राजन गवस टिपतात.

राजन गवस यांच्या एकूण सहा कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, एक कवितासंग्रह आणि तीन ललित गद्यसंग्रह इतरही साहित्य प्रकाशित झाले आहे. या साहित्यकृतीतून आलेली भूमी ही कोल्हापूर-गडहिंग्लज -गारगोटी या परिसराची आहे.

राजन गवस यांच्या साहित्याची भूमी आणि त्या साहित्यकृतीतून आलेली आशयद्रव्यांची अपरिहार्यता हा एक विशेष असल्याचे दिसून येते. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने, शोषितांबद्दलची कणव म्हणून देवदासींच्या प्रश्नावर जाणीवपूर्वक त्यांनी लेखन केले आहे. 'कळप', 'धिंगाणा', 'तणकट' मधून झालेले लेखन हे एका संवेदनशील प्रतिभावंताच्या भूमिकेतून झाले आहे. समकालीन परिस्थितीत कृषिजन व्यवस्थेच्या पडझडीला तरलतेने टिपण्यात ते यशस्वी झालेले आहेत.

राजन गवस यांच्या साहित्याची भूमी ही महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भूभागाची आहे. ही भूमी गडहिंग्लज, गारगोटी, अत्याळ, बेडकीहाळ, निगनूर, जोगळभावी, सौंदत्ती, महागाव, इंचनाळ, कोट, ऐनापूर, इचलकरंजी, वेळगुंदी, गिजवणं, करंबळी, मिणचं, गोनाळ, निपाणी, शिपूर, बेळगुंदी, कागल, पिंपळी, गोकाक, संकेश्वरी, वडरगे अशी असून या परिसरात असलेल्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक वैशिष्ट्यांच्या प्रभावासह हा भूभाग राजन गवस यांच्या साहित्यातून आविष्कृत झालेला आहे.

**संदर्भः**

**१. सतीश काळसेकर / जगण्यापासून लिहिण्यापर्यंत** / युगांतर / दिवाळी, २००३ /पृष्ठः ७३,
**२. प्रवीण बांदेकर / गवस राजन यांची मुलाखत** / अभिधानंतर / संपा. हेमंत दिवटे /दिवाळी विशेषांक, २००२/पृष्ठः ७, **३. राजन गवस / काचाकवड्या** / स्पर्श प्रकाशन, पुणे / पहिली आवृत्ती, ऑगस्ट, २००५ /पृष्ठः ३४, **४. सतीश काळसेकर** / उनि. / पृष्ठः ७३, **५, नरेंद्र दाभोळकर (संपा.) / झपाटलेपण ते जाणतेपण** / साधना प्रकाशन, पुणे / दुसरी आवृत्ती, मार्च, २०१०/ पृष्ठः २२, **६. सतीश काळसेकर** / उनि. / पृष्ठः ७३, **७. नरेंद्र दाभोळकर (संपा.)** / उनि. / पृष्ठः २२, **८. तत्रैव** / पृष्ठः २३, **९. तत्रैव** / पृष्ठे: २३, २४, **१०. तत्रैव** / पृष्ठः २४, **११. तत्रैव** / पृष्ठः २५, **१२. तत्रैव** / पृष्ठः २५, **१३. तत्रैव** / पृष्ठः २६, **१४. तत्रैव** / पृष्ठः २७ **१५. प्रवीण बांदेकर** / उनि. / पृष्ठः २०, **१६. नरेंद्र दाभोळकर (संपा.)** / उनि. / पृष्ठः २४, **१७. सतीश काळसेकर** / उनि. / पृष्ठः ७४ **१८. तत्रैव** / पृष्ठः ७४, **१९. तत्रैव** / पृष्ठः ७४, **२०. राजन गवस / भंडारभोग** / मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे/ दुसरी आवृत्ती, २००१ /अर्पणपत्रिका **२१. नरेंद्र दाभोळकर (संपा.)** / उनि. / पृष्ठः २८, **२२. तत्रैव** / पृष्ठः २३, २४, **२३. प्रवीण बांदेकर** / उनि. / पृष्ठः ८, **२४. सतीश काळसेकर** / उनि. / पृष्ठः ७३, **२५. तत्रैव** / पृष्ठः ७४, **२६. मदन कुलकर्णी / देवदासी यल्लम्माच्या जोगतिणी** / विजय प्रकाशन, नागपूर / पहिली आवृत्ती, जून, १९९४ / पृष्ठः १३६

---------------------------------------------